# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com

**तात्काळ/महत्वाचे.**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/१८०८

दिनांक :- 23 MAY 2017

प्रति,

**प्राचार्य,**

पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,

औरंगाबाद विभाग

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता पहिल्या/दुस-या पाळीतील अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत शुन्य करणेबाबत..**

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे पत्र क्र.१०/एडीएम/पदविका/२०१७/३३८१ दिनांक ०९/०५/२०१७

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या पदविका, अभ्यासक्रमांच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, मागील शैक्षणिक वर्षामध्ये काही संस्था मंजूर प्रवेशक्षमता व प्रत्यक्ष प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या अनुषंगाने महाविद्यालयास सदर अभ्यासक्रमातील कार्यरत शिक्षक/कर्मचारी यांच्या वेतनाची तजवीज करणे महाविद्यालयास अत्यंत अडचणीचे जात असल्याने पहिल्या/दुस-या पाळीतील एखादया अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत शुन्य म्हणजेच प्रवेश न करणेबाबत कळविण्यात येत असल्याचे संदर्भिय पत्रात नमुद करण्यात आलेले आहे.

या पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता पहिल्या/दुस-या पाळीतील एखादया अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत शुन्य म्हणजेच प्रवेश न करणेबाबत संस्थेचा प्रस्ताव असल्यास खालील कागदपत्रासह २०/०५/२०१७ पर्यंत संचालनायास सादर करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

१. संस्थेतील पहिल्या/दुस-या पाळीतील एखादया अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत शुन्य करावयाची असल्यास त्याबाबत कर्मचा-यांची किंवा विद्यार्थ्यांच्या तक्रारी, देय असलेली देणी,न्यायालयीन प्रकरणे इ. उद्भवल्यास त्यास संपुर्णपणे संस्था जबाबदार राहील अशा आशयाचे रक्कम रु.१००/- चे स्टँपपेपर सचिव/अध्यक्ष व प्राचार्य यांनी स्वाक्षरी केलेले नोंदणीकृत मुळ हमीपत्र.

२. संस्थेतील पहिल्या/दुस-या पाळीतील एखादया अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत शुन्य करणेबाबत संस्थेचा सचिव/अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीच्या ठरावाची मुळ प्रत सादर करण्यात यावी.

तसेच प्रस्तावाची एक प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सादर.
~~२. प्रोग्रामर~~ यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी

Institute Later 2016